महाराष्ट्र वन विभाग
वन विभाग
दुरध्वनी क्रमांक- (02162) 220057, 220058, 220059
Email - forest.satara68@gmail.com

महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक, सातारा वन विभाग, सातारा यांचे कार्यालय
"वनभवन", गोडोली वन रोपवाटीका परिसर,गोडोली, सातारा 415 001

जा.क्र.ब/जमिन/2020.21/ 1260
सातारा दिनांक 16 /09/2020.

प्रति,

डिव्हीजनल रेल्वे मॅनेजर,
(वर्क्स सेंट्रल रेल्वे),
पुणे - 411 001

विषय - Permission for DGPS Survey of existing Holiday home Survey No. 223 village - Malkampeth, Tal- Mahabaleshwar, Dist. - Satara. Under Forest (Conservation) Act, 1980.

संदर्भ :- 1. आपलेकडील पत्र क्र. PA/W/DB/LM/Holiday Home/Mshwar दि. 27/05/2019.
2. या कार्यालयचे पत्र क्र. ब/जमीन/1459 दिनांक 05/08/2019.
3. या कार्यालयाचे पत्र क्र. ब/जमीन/3106 दिनांक 07/12/2019.
4. या कार्यालयाचे पत्र क्र. ब/जमीन/464 दिनांक 01/07/2020.
5. या कार्यालयाचे पत्र क्र. ब/जमीन/714 दिनांक 23/07/2020.
6. आपलेकडील पत्र क्र. PA/W/DB/LM/Holiday Home/Mshwar दि. 17/07/2020.
7. या कार्यालयाचे पत्र क्र. 1090 दिनांक 28/08/2020
8. आपलेकडील पत्र क्र. PA/W/DB/LM/Holiday Home/Mshwar दिनांक 25/08/2020

आपले लक्ष संदर्भीय पत्रांकडे वेधण्यात येत आहे. प्रकरणी रेल्वे हॉलिडे होमसाठी लागणा-या वनजमीनीचा वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत परिपुर्ण प्रस्ताव एकत्र सादर करणेबाबत वांरवार कळविण्यात आले आहे.

प्रकरणी आपलेकडील संदर्भीय पत्र क्र. 8 चे पत्रासोबत वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत च्या प्रस्तावाच्या 7 प्रती या कार्यालयास सादर केलेल्या आहेत. सदर प्रस्तावाची तपासणी केली असता त्रुटी खालील प्रमाणे आहेत.

1. प्रथमत: वनक्षेत्रपाल, महाबळेश्वर यांना योग्य ते सहकार्य करुन भाडेपट्याचे क्षेत्र वनविभागाचे ताब्यात देणेत यावे. त्यानंतर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करावी.
2. आपण सादर केलेले प्रस्ताव हे मुळ प्रतीत नसुन त्याच्या छायांकीत प्रतीत या कार्यालयास सादर केले आहेत. सदर प्रस्तावा हा केंद्रशासनाचे मंजुरीकामी सादर करावा लागतो. त्यामुळे आपण जो प्रस्ताव सादर करण्यात येणार आहेत ते सर्व मुळ स्वाक्षरी सह आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत.
3. तसेच आपण कळविलेनुसार आपणास 1.5457 हे. वनक्षेत्राची आवश्यकता लागणार आहे. आपणास आवश्यक क्षेत्र हे 1 हेक्टर पेक्षा जास्त असले कारणाणे आपणास लागणा-या वनक्षेत्राऐवढेच क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी वनविभागास देणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने पर्यायी क्षेत्र हे वनविभागाचे क्षेत्रालगत असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे योग्य

Scanned with CamScanner

ती कार्यवाही करुन पर्यायी वनीकरणासाठी लागणारे 1.5457 हे. क्षेत्र वनविभागाचे ताब्यात देण्याची कार्यवाही करावी लागेल.

4. सदर प्रस्ताव हा नव्याने सादर करण्याबाबत आपणास कळविण्यात आले असुन देखील आपण सन 2007 मधील प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे. तरी तो सुधारित प्रस्ताव करावा.

5. प्रस्तावाचे नाव extention of lease असे नमुद केले आहे. त्याऐवजी Diversion of forest land for Reilway Holiday home, Mahabaleshwar असे असणे आवश्यक आहे. तसेच त्या अनुषंगाने प्रमाणपत्रे व सर्व कागदपत्रांमध्ये तशी दुरुस्ती करावी लागेल.

प्रकरणी वरील प्रमाणे प्रस्तावासंबंधी माहिती घेऊन परिपुर्ण प्रस्ताव या कार्यालयास व ऑनलाईन सादर करणेची कार्यवाही करावी, ही विनंती.

(डॉ. भारत सिह हाडा)
उपवनसंरक्षक,
सातारा वनविभाग, सातारा

सोबत - आपण सादर केलेले सर्व प्रस्ताव

प्रत - सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण), सातारा यांना माहितीसाठी.

प्रत - वनक्षेत्रपाल, महाबळेश्वर यांना वरील संदर्भान्वये माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.
2/- प्रकरणी प्रथमत: सदर भाडेपट्टयाचे क्षेत्र हे वनविभागाचे ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी व केले कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

Scanned with CamScanner